CNRMHAH1900 1580 2017

## <u>रे मु नं. ३४८/२०१७ मध्ये नि.२१ वर आदेश</u>

( प्रांजली संदिप नागरे वि. भुजंग उत्तम नागरे )

वादीने सदरच्या अर्जात असे म्हटले आहे की, सदर दावा दाखल करतेवेळी मिळकतीचे सात बारा उतारे दाखल केले आहेत. सदर सात बारा उता–यामध्ये प्रतिवादी भुजंग उत्तम नागरे यांच्या नावाची उता–याला नोंद आहे. संबधित प्रतिवादी यांनी वादीला कोणतीही माहिती होउ न देता वादीची संमती नसताना मिळकत गट नं.७२/३ पैकी क्षेत्र दावा दाखल करणेपूर्वीच पोकळीस्त बिनकब्जाचे खरेदीखत दि.२.३.२०१७ रोजी दामू नामदेव मारकडे यांच्या हक्कामध्ये केले आहे. त्यामूळे झालेल्या व्यवहाराबाबत खालीलप्रमाणे दुरुस्ती करणे गरजेचे आहे. सबब,

- दाव्याच्या टायटल कॉलममध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.
- प्रतिवादी नं.५ दामू नामदेव मारकंडे, वय ६२ धंदा शेती, रा. माळेगाव, ता. शिरुर कासार, जि.बीड

- तसेच दावा विषयाची किंमत १०००+ १००० ऐवजी दावा रुपये १०००+ १००० व विषयाची किंमत १०००+ १०००+ १००० असे लिहीणेस परवानगी असावी.

- तसेच टायटलमध्ये वादींचा दावा वाटप होउन तुटक कब्जा मिळण्यासाठी व निरंतर ताकिदीसाठी ऐवजी 'वादींचा दावा वाटप होउन तुटक कब्जा मिळणेसाठी निरंतरची ताकिद व जाहीर ठरावासाठी' अशी दुरुस्ती परवानगी मिळावी.

- तसेच दावा मिळकतीचे वर्णनामध्ये 'गट नं.३२ मध्ये .........वस्तीमध्ये राहत आहे' असा उल्लेख आला आहे. अनावधानाने टायपींग करताना गट नं. सांगताना चूक झालेली आहे. वस्ती गट नं.३२ मध्ये नसून गट नं.७२/३ मध्ये आहे. त्याअनुषंगाने पुढीलप्रमाणे दुरुस्ती करणे गरजेचे आहे. ''गट नं.७२/३ पैकी ....... वस्तीमध्ये राहत आहेत''

- दावा कलम ९ च्या पुढे ९अ. प्रतिवादी यांनी संगनमताने ...... हिश्यावर कायम करण्यात यावे'' अशी दुरुस्ती करण्यात यावी
- तसेच ९ब. प्रतिवादी नं.५ यांनी ........ भाग पडलेले आहे'' हे नमूद करण्यात यावे
- दावा कलम ११ च्या पुढे '११अ. वादीने सदरचे ...... तितकीच केलेली आहे' अशी दुरुस्ती करण्यात यावी
- दावा कलम १४ मध्ये १४ह. प्रतिवादी नं.१ यांनी .......... ठरविण्यात यावे' व
- १४ज. प्रतिवादी नं.५ यांचे ............. ताकिद देवविण्यात यावी'' अशी दुरुस्ती करण्यात यावी

३. वादीचे पुढे असे म्हणणे आहे की सदरची दुरुस्ती करणे आवश्यक झालेले आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुपात बदल होत नाही व दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यास मदत होईल. सबब अर्ज मंजूर करण्यात यावा.

४. प्रतिवादी यांना पुरेशी संधी देउनही त्यांनी अर्जाला म्हणणे दिले नाही. सबब दि.१.८.२०२२ रोजी नि.२१ वर आदेश पारित करुन अर्ज प्रतिवादीच्या म्हणण्याविना चालविण्यात आला.

५. वादीचा युक्तीवाद ऐकला.

६. अर्जामध्ये नमूद दुरुस्तीचे अवलोकन केले असता वादीने दाव्याच्या टायटल कॉलम व मिळकतीमध्ये व विनंती कलमामध्ये दुरुस्ती करुन मागितलेली आहे. वादीने दावा मिळकतीच्या झालेल्या खरेदीखतानुसार आवश्यक असणा–या दुरुस्त्या करणे गरजेचे आहे असे नमूद केले आहे. सदर अर्जामध्ये नमूद केलेल्या दुरुस्त्या मंजूर झाल्यास मुळ दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. दावा वाटपासाठी दाखल केलेला आहे. दावा स्थावर मिळकतीबाबत आहे. दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्याकरता वादीने मागितलेली दुरुस्ती गरजेची आहे. वादीने योग्य ती खबरदारी घेउन सुध्दा न्याय चौकशी सुरु होण्यापूर्वी सदरच्या अर्जात नमूद केलेली दुरुस्ती मधील बाब पुढे त्यांना का आणता आली नाही याचे स्पष्टीकरण दिलेले आहे. सदरच्या दुरुस्तीने न्यायनिर्णयात दाव्यातील खरा वाद सोडवण्यास मदत होइल. वादीचा सदरचा अर्ज प्रतिवादीला रु. २००/– खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करणे मला न्यायोचित वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज रक्कम रु.२००/– कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात आला.

२. वादीने सदरची दुरुस्ती आदेशापासून १४ दिवसाचे आत करावी.

दि. २२/०२/२०२४
शेवगाव.

(एस. यू. जागुष्टे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
शेवगाव